संक्रमण शिबीर गाळे वितरणाबाबत अवलंबवयाची कार्यपध्दती.

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

क्र.उपमुअ/संगा/दुवपु/ET- ३२०३/२०२१, दिनांक :- १३/१०/२०२१

## परिपत्रक :

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे म्हाड कलम १९७६ अन्वये मधील प्रकरण ८ व ८(अ) अनुसार उपकरप्राप्त इमारतीच्या भाडेकरू/रहिवाश्यांना त्यांची उपकरप्राप्त इमारत धोकादायक अथवा दुरूस्तीच्या कामी हाती घेतली असल्यास अशा भाडेकरू/ रहिवाश्यांना उपकरप्राप्त इमारतीमधून मंडळाकडे उपलब्ध असलेल्या संक्रमण शिबीरामध्ये (Transit Camp) कार्यकारी अभियंता यांच्या प्राप्त प्रस्तावानुसार तात्पुरते स्थलांतर देण्यात येते.

असे निदर्शनास आले आहे की, संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्याकडून सन १९७१ ते २०००-०१ या दरम्यानच्या कालावधीमधील तसेच सन १९७१ वा त्यापूर्वीच्या सुध्दा निष्कासन सुचनाच्या आधारे संक्रमण शिबीर वितरण करण्यात यावे, असा प्रस्ताव संक्रमण शिबीर विभागाकडे संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त होतात जेव्हा की निर्गमित केलेली निष्कासन सुचनेचा कार्यकाळ हा ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटलेला असताना अशा निष्कासन सुचनावर संक्रमण शिबीर गाळे वितरण करण्याबाबतचा प्रस्ताव सखोल तपासणी न करता सरसकट प्राप्त होतात हि बाब प्रशासकीय दृष्ट्या इष्ट नाही.

त्यामुळे या परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. सन २००१ व तद्पूर्वीचे वर्षापर्यंत निर्गमित करण्यात आलेल्या निष्कासन सुचनेच्या आधारे संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करणेबाबतचा प्रस्ताव पाठविताना अर्जदार भा/र यांना संक्रमण शिबीर गाळ्याचे यापूर्वी वितरण झाले नसल्याचे खात्री पटल्यास याबाबतचा प्रस्ताव संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी आपल्या स्तरावर योग्य ती छाननी करून व अर्जदार भा/र यांना संक्रमण शिबीर गाळ्याची खरच आवश्यकता आहे याबाबत खातरजमा करूनच प्रस्ताव वरीष्ठांकडे सादर करावा.

२. सन २००१ व तद्पूर्वीच्या निर्गमित करण्यात आलेल्या निष्कासन सुचनेच्या आधारे संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडून सादर करताना सोबत निष्कासन सुचनेची प्रत व भाडेकरू/ रहिवाशी यांची यादी प्रमाणित करून तसेच इमारत दुरूस्ती करताना /इमारत जमीनदोस्त करताना सदर भा/र यांनी संक्रमण शिबीर गाळ्याची मागणी केली होती. तथापि, संक्रमण शिबीर गाळा घेतला नाही याबाबतची कारणमिमांसा व त्यावेळेस संक्रमण शिबीर गाळ्याचा ताबा घेतला होता व तद्नंतर सदर गाळा मंडळाकडे सुपूर्द करण्यात आला व आता नव्याने मागणी करण्याचे कारण काय ? याबाबतच्या स्वयंस्पष्ट अहवालासह प्रस्ताव सादर करावा.

३. सन २००१ व तद्पूर्वीच्या निर्गमित करण्यात आलेल्या निष्कासन सुचनेवर नमूद असलेली उपकरप्राप्त इमारतीची सद्यस्थिती स्पष्ट करण्यात यावी, जसे की उपकरप्राप्त इमारत जमीनदोस्त करण्यात आली आहे. तळमजला अस्तित्वात आहे,इमारतीचा पुनर्विकास/ पुनर्रचना होणार आहे किंवा कसे, उपकरप्राप्त इमारतीमध्ये एकूण मुळ भाडेकरू/ रहिवाशी यांची संख्या, उपकरप्राप्त इमारतीमधील निवासी/ अनिवासी गाळ्यांची संख्या इत्यादी.

४. संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करण्याबाबतचा प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या उपकरप्राप्त इमारतीमधील यापूर्वी वितरण केलेल्या भाडेकरू/ रहिवाशांची संख्या, भाडेकरू/ रहिवाश्यांचे नाव, व संक्रमण शिबीरातील वितरणाबाबतचा तपशील तसेच मुळ गाळे धारकांची ओळख पटविणे,आधारकार्ड व फोटो प्रमाणित करणे इत्यादीसह परिपूर्ण प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करणे अनिवार्य आहे.

५. सन २००१ व तद्पूर्वीच्या निर्गमित करण्यात आलेल्या निष्कासन सुचनेच्या आधारे संक्रमण शिबीर गाळ्याचा वितरण करणेबाबतचा प्रस्ताव सादर करताना अद्याप पर्यंत नमूद /संबंधीत भाडेकरू/रहिवाशी यांचेकडून संक्रमण शिबीर गाळ्याची मागणी का करण्यात आली नाही याबाबतची शहानिशा करूनच पुढील प्रस्ताव सादर करावा.

६. संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव सदोष वाटल्यास सदर प्रस्तावावर उपमुख्य अधिकारी/संगा/दुवपु मंडळ यांचे स्तरावर सक्षम पक्षकारास सुनावणीची संधी देऊन प्रस्तावाची खातरजमा करावी.

७. मंडळाने धोकादायक व अतिधोकादायक इमारती घोषित झाल्यानंतर त्यासंबंधीचे भाडेकरूंना प्राधान्याने संक्रमण शिबीर गाळे देण्यात यावे त्यास सुनावणीची आवश्यकता राहणार नाही.

८. उपरोक्त सुनावणीत संक्रमण शिबीर गाळ्याच्या वितरणाबाबतचा प्रस्ताव अमान्य केल्यास याबाबत **मा.मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांचेकडे १५ दिवसांत अपिल दाखल करण्याबाबत संबंधीत भाडेकरू/** रहिवाशी यांना आवश्यकता असल्यास निदर्शनास आणून देण्यात यावे.

९. सुनावणीत घेतलेल्या निर्णयानुसार संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण करताना संक्रमण गाळ्याची उपलब्धता तसेच भाडेकरू/ रहिवाशी यांची मागणी विचारात घेता संक्रमण गाळे वितरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१०. संक्रमण शिबीर गाळ्याचे वितरण मा.सहमुख्य अधिकारी/ दुवपु मंडळ यांचेस्तरावर करण्यात यावे.

वरील कार्यपद्धतीची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण,मुंबई

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण
मा.सभापती/दुवपु मंडळ,मुंबई.
मा.मंत्री,गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक

प्रत माहितीसाठी :-

१) मुख्य अभियंता-३/ प्राधिकरण
२) विधी सल्लागार/ प्राधिकरण
३) वित्त नियंत्रक/ प्राधिकरण
४) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ प्राधिकरण
५) सचिव/ प्राधिकरण
६) सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
७) मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण

प्रत माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१) उपमुख्य अभियंता, परिमंडळ-१/ २/ ३/ ४, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
२) निवासी कार्यकारी अभियंता/ मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
३) उपमुख्य अधिकारी, संगा/ पुगा, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
४) कार्यकारी अभियंता-अे, बी-१/ २, सी-१/ २/ ३, डी-१/ २/ ३, ई-१/ २, ग-दक्षिण/ उत्तर, फ-दक्षिण/ उत्तर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
५) मुख्य लेखाधिकारी, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
६) विशेष भुसंपादन अधिकारी, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
७) मिळकत व्यवस्थापक,-अे, बी-१/ २, सी-१/ २/ ३, डी-१/ २/ ३, ई-१/ २, ग-दक्षिण/ उत्तर, फ-दक्षिण/ उत्तर मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई.
८) मिळकत व्यवस्थापक (संगा)/ (पुगा) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
९) प्रशासकीय अधिकारी/ मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण,मुंबई